TITLE-CODE:- MAHMAR52789

# आपला मराठी टाइम्स

संपादक : अनिल राजाराम पवार    कार्यकारी संपादक: मुकेश आर्मा देवेंद्र    APLA MARATHI TIMES

वर्ष : १ ● अंक : ३६ ● साप्ताहिक ● मुंबई ● भाषा : मराठी ● सोमवार : २ ते ८ सप्टेंबर २०२४ ● पृष्ठ - ८ ● मुल्य : ६ रुपये

# १४ गावांवरून नाईक-मुख्यमंत्री वाद ?


**नवी मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र डॉ. श्रीकांत यांच्या कल्याण लोकसभा मतदारसंघातील १४ गावांचा नवी मुंबई महापालिका हद्दीत समावेशास ऐरोलीतील भाजप आमदार गणेश नाईक यांनी विरोध केला आहे. याबाबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत ही भूमिका मांडल्याचे वृत्त आहे. मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या नगरविकास विभागाने गेल्या आठवड्यात काढलेल्या एका आदेशानुसार या गावांच्या नियोजनाचे अधिकार नवी मुंबई महापालिकेकडे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्तांची भेट घेत या गावांमध्ये एक रुपयाचाही खर्च केला तर याद राखा, असा इशारा नाईक यांनी दिल्याचे समजते. विशेष म्हणजे, १माझी ही भूमिका तुमच्या मुख्यमंत्र्यांना कळवा, अशा शब्दांत नाईकांनी उपस्थित अधिकाऱ्यांना बजावल्याने १४ गावांच्या समावेशावरून नाईक-मुख्यमंत्री पुन्हा एकदा



आमने-सामने आल्याचे चित्र आहे. नवी मुंबई महापालिकेतून वगळलेल्या ठाणे-कल्याणच्या वेशीवरील १४ गावांचा नवी मुंबई महापालिकेत पुन्हा समावेश करण्याचा निर्णय राज्य सरकारने मार्च २०२४ मध्ये घेतला. एकेकाळी वाढीव मालमत्ता कराच्या प्रश्नावर नवी मुंबई महापालिकेतून बाहेर पडल्याने ही गावे समस्यांच्या गर्तेत सापडली होती. यातून बोध घेऊन या गावातील ग्रामस्थांनी आमच्या गावांचा पुन्हा नवी मुंबई महापालिकेत समावेश करावा अशी मागणी लावून धरली होती. ती लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी महायुती सरकारने शासन निर्णय काढून पूर्ण केली. या निर्णयामागे कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा आग्रह महत्त्वाचा ठरला. नवी मुंबई हे नियोजित शहर आहे. महापालिकेच्या मालकीचे स्वत:चे धरण आहे. इथली कचराभूमी ही उत्तम दर्जाची आहे. त्यामुळे १४ गावांचा निर्णय राज्य सरकार घेत असेल तर तेथील पायाभूत सुविधा, बेकायदा बांधकामांचे उच्चाटन याची तजवीज सरकारनेच करावी. मगच यासंबंधी निर्णय घेणे नवी मुंबईकरांसाठी हितावह ठरेल.

## राज्यात ऑगस्टमध्ये डेंग्युमुळे १२ जणांचा मृत्यू; सर्वाधिक मृत्यू रायगड, नाशिकमध्ये

**मुंबई** : राज्यात ऑगस्टमध्ये डेंग्यूचे तीन हजार १७० रुग्ण सापडले असून, त्यापैकी १२ जणांचा मृत्यू झाला आहे. सर्वाधिक मृत्यू रायगड व नाशिकमध्ये झाले आहेत. त्यामुळे जानेवारीपासून डेंग्यूच्या मृतांची संख्या १५ वर पोहोचली आहे. डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण मुंबईमध्ये सापडले असले तरी मुंबईमध्ये डेंग्यूने एकही मृत्यू झालेला नाही. गतवर्षीच्या तुलनेत जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ होण्याबरोबरच मृतांच्या संख्येतही वाढ झाली आहे. २०२३ मध्ये ऑगस्टपर्यंत पाच जणांचा मृत्यू झाला होता. राज्य सरकार डेंग्यू प्रतिबंधासाठी सर्वतोपरीने प्रयत्न करीत असले तरी त्याला फारसे यश आलेले नाही. राज्यामध्ये आतापर्यंत डेंग्यूचे ८ हजार ३१५ रुग्ण सापडले आहेत. राज्यात जानेवारी -जुलैदरम्यान डेंग्यूचे ४ हजार ९६५ रुग्ण सापडले होते.



ऑगस्टमध्ये डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. ऑगस्टमध्ये डेंग्यूचे ३ हजार १७० रुग्ण सापडले आहेत. जानेवारी -जुलै या सहा महिन्यांच्या तुलनेत ऑगस्टमध्ये सर्वाधिक रुग्ण सापडले आहेत. तसेच राज्यात जुलैपर्यंत डेंग्यूमुळे तिघांचा मृत्यू झाला होता. राज्यात डेंग्यूप्रमाणेच हिवतापाच्या रुग्णांच्या संख्येतही वाढ झाली आहे. राज्यामध्ये जानेवारीपासून आतापर्यंत हिवतापाचे ११ हजार ८०८ रुग्ण सापडले आहेत. जानेवारी ते जुलैदरम्यान हिवतापाचे ७ हजार ४७४ रुग्ण सापडले होते. ऑगस्टमध्ये या रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, तब्बल ४ हजार ३६१ रुग्ण सापडले आहेत. ऑगस्टमध्ये हिवतापाच्या एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. तसेच ऑगस्टमध्ये चिकनगुनियाचे ७९६ रुग्ण सापडले आहेत.

## भाईंदर मधील शिवरायांचा पुतळा उद्घाटनाच्या प्रतीक्षेत ! मुख्यमंत्र्यांना वेळच मिळेना

**भाईंदर** : मिरा भाईंदर महानगरपालिकेने उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा गेल्या आठ महिन्यांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे. २६ जानेवारी गेला आणि १५ ऑगस्टची तारीख उलटूनही या पुतळ्याचे अनावरण झालेले नाही. या पुतळ्याच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्र्यांची वेळ मिळत नसल्यामुळे महाराजांचा पुतळा झाकून ठेवण्याची नामुष्की पालिकेवर ओढवली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने मुंबई-अहमदाबाद मार्गावरून किल्याजवळ जार्णाऱ्या मुख्य चौकावर ३० फूट उंच ब्राँझ धातूचा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारला आहे. मे. गारनेट इंटिरिअर या कंपनीने २०२१ मध्ये या पुतळ्याचे काम सुरु केले होते. पुतळा उभारण्यासाठी २ कोटी ९५ लाखाचा खर्च निर्धारित करण्यात आला आहे.



त्यानुसार चौथरा उभा राहिल्यानंतर पुतळा उभारण्यात आला. मागील आठ महिन्यापासून हे काम पूर्ण होऊनही पुतळ्याचे अनावरण न झाल्यामुळे आता पुतळ्यावर लाल कपडा टाकून झाकण्यात आला आहे. पुतळा दुर्घटनेनंतर भाईंदरच्या या पुतळ्याचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उद्घाटनाचा दिवस अजूनही ठरवण्यात आलेला नाही. तसेच त्या ठिकाणी शिल्लक राहिलेले काम सुरु आहे. -यतीन जाधव, उप-अभियंता ( मिरा भाईंदर महानगरपालिका)**

महापालिकेकडून या पुतळ्याच्या उद्घाटनाचा कार्यक्रम सातत्याने लांबणीवर टाकला जात आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार या पुतळ्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्याचा स्थानिक लोकप्रतिनिधींचा आग्रह आहे. मात्र मुख्यमंत्र्यांची वेळ मिळत नसल्यामुळे उद्घाटनाची निश्चित तारीख ठरू शकलेली नाही. परिणामी नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

# मुंबईत वर्षभरात विनयभंगाच्या दोन हजारांहून अधिक घटना

**मुंबई** : देशातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना मुंबईत गेल्या वर्षभरात विनयभंगाचे सुमारे दोन हजार गुन्हे दाखल झाल्याची खळबळजनक माहिती उघडकीस आली आहे. तसेच, बलात्कारप्रकरणी ९०० हून अधिक गुन्हे नोंदविण्यात आल्याचे माहिती अधिकारातून निदर्शनास आले आहे. दरम्यान, एका वर्षात महिलांवरील अत्याचार, विनयभंग आणि पॉक्सो नियमांतर्गत तब्बल ४,३५१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. १ जुलै २०२३ ते जून २०२४ दरम्यान मोबाइल आणि सोनसाखळी चोरी, दरोडे, लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा (पॉक्सो) अंतर्गत गुन्हे, खून, अमली पदार्थांची विक्री, साठवणूक, सेवन आदी घटनांमध्ये २५ हजारांहून अधिक गुन्हे दाखल करण्यात आल्याची बाब माहिती अधिकार कायद्याअंतर्गत उघडकीस आली आहे. मुंबईत १ जुलै २०२३ ते जून २०२४ या कालावधीत विनयभंगाचे २२५३ गुन्हे दाखल झाल्याची माहिती आहे.



तर, बलात्काराच्या प्रकरणात ९६४ गुन्हे दाखल झाले आहेत.

मोबाइल आणि सोनसाखळी प्रकरणी ४८५, घरावरील दरोड्यासंदर्भात १३३४, पॉक्सो कायद्यांतर्गत ११३४, खून आणि खुनाच्या प्रयत्नाप्रकरणी ४४४, मद्याधुंद अवस्थेत वाहन चालविल्याप्रकरणी १२,७६७ आणि अमली पदार्थांची विक्री, साठवणूक, सेवन आदी घटनांमध्ये ८,९८२ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, अशी माहिती ही माहिती अधिकारांतर्गत केलेल्या अर्जाच्या उत्तरातून पुढे आली आहे.

**वर्षभरातील नोंद गुन्हे**

मद्याधुंद अवस्थेत वाहन चालविणे - १२,७६७

अंमली पदार्थ विक्री, सेवन - ८,९८२

पॉक्सो - १,१३४

दरोडो - १,३३४

विनयभंग - २,२५३

बलात्कार - ९६४

खून, खुनाचा प्रयत्न - ४४४

चोरी - ४८५

**१ जुलै २०२३ ते जून २०२४ या कालावधीत दाखल गुन्हे**

मुंबईत महिला आणि बालके सुरक्षित नाहीत. पोलीस व गृहखाते नेमके काय काम करत आहे? मुंबईत घडत असलेल्या गुन्ह्यांमध्ये बहुतांश आरोपी परप्रांतीय आहेत. त्यामुळे पोलिसांनी मुंबईत येर्णाया प्रत्येक परप्रांतीयांची बायोमेट्रिक पद्धतीने नोंदणी करावी. -संतोष घोलप, माहिती अधिकार कार्यकर्ते

# खारमध्ये एका व्यक्तीला बेकायदेशिररित्या ताब्यात घेतल्याप्रकरणी चार पोलीस निलंबित

**मुंबई**: खार परिसरातील एका व्यक्तीला बेकायदेशिररित्या ताब्यात घेतल्याच्या आरोपाखाली चार पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रीकरणात यापैकी एकाने या व्यक्तीच्या खिशात अमली पदार्थ ठेवल्याचे निदर्शनास आले. याबाबत चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. खार परिसरात ३० ऑगस्ट रोजी ही घटना घडली. गोठ्यात काम करणाऱ्या डॅनियलला अमली पदार्थ



बाळगल्याच्या संशयावरून खार पोलीस ठाण्यातील चार पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्या खिशात २० ग्रॅम मेफेड्रोन सापडल्याचा दावा करण्यात आला होता. त्यानंतर घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रण तपासले असता पोलीस असल्याचा दावा करणारी एक व्यक्ती डॅनियलच्या खिशात काही तरी ठेवत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी तातडीने डॅनियलला सोडले. तसेच त्याला केवळ संशयावरून ताब्यात घेण्यात आले होते, असे सांगणयात आले. हे चित्रीकरण समाजमाध्यमांवर वायरल झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी डॅनियला ताब्यात घेणारे दोघे व त्याच्या सोबत असलेल्या व्यक्तींची माहिती घेण्यात आली. ते चौघेही खार पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणाची चौकशी केली असता चौघांनीही प्रचलित कायदेशिर पद्धतीचा अवलंब न करता डॅनियलला ताब्यात घेण्यात आल्याचे निष्पन्न झाले. तसेच अंगझडती घेताना त्यांच्या हालचाली संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले. अखेर त्या पोलिसांविरोधात निलंबनाची कारवाई करण्यात आली असून पुढील चौकशी प्रस्तावित करण्यात आल्याचे उपायुक्त (परिमंडळ-९) राजतिलक रौशन यांनी सांगितले.

# अल्पवयीन मुलीवर बलात्काराच्या दोन घटना ; सावत्र पिता आणि काकांकडून बलात्कार

**वसई**: वसई आणि नालासोपार्य़ात अल्पवयीन मुलींवर बलात्काराच्या आणखी दोन घटना घडल्या आहेत पहिल्या घटनेत नालासोपारा येथे सावत्र पिता १५ वर्षीय मुलीवर मागील ३ महिन्यांपासून बलात्कार करत होता. तर दुसऱ्या घटनेत नालासोपाऱ्यात एका इसमाने आपल्या १७ वर्षीय पुतणीला धमकावून तिच्यावर बलात्कार केला आहे. लहान मुलींवर लैंगिक अत्याचाराचे सत्र सुरूच आहे. मंगळवारी तुळींज आणि पेल्हार पोलीस ठाण्यात दोन वेगवेगळ्या प्रकरणात बलात्कार आणि पोक्सो




अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिली घटना नालासोपारा येथील तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. चाळीस वर्षे सावत्र पिता १५ वर्षीय मुलीवर सतत तीन महिने बलात्कार करत होता. ४ जून ते २५ ऑगस्ट या कालावधीमध्ये हा सावत्र पिता मुलीला धमकावून घरात कोणी नसताना तिच्यावर लैंगिक अत्याचार करत होता. कोणाला सांगितलं तर तुला आणि तुझ्या लहान बहिणीला मारून टाकेल अशी धमकी तो देत होता. अखेर हा अत्याचार सहन न झाल्याने या तिने मंगळवारी आपल्या आईला हा प्रकार सांगितला. आईने लगेच तुळींज पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर आरोपी सावत्र पित्यावर बलात्कार आणि पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. दुसरी घटना नालासोपारा येथील पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. पीडित मुलगी १७ वर्षांची आहे. मंगळवार २६ ऑगस्ट रोजी दहिसर येथे राहणारे तिथे काका घरी आले. यावेळी घरी कुणी नव्हते. त्याने तिला धमकावून तिच्यावर दोन वेळा बलात्कार केला. संध्याकाळी आई घरी आल्यावर हा प्रकार तिने आपल्या आईला सांगितला आणि त्यानंतर त्यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पेल्हार पोलिसांनी आरोपी काका विरोधात पोक्सो आणि बलात्कार अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

# डिझाइन चोरल्याच्या संशयावरून मारहाण, एक लाखांची खंडणी मागितल्याचा आरोप

**मुंबई** : नोकरी सोडल्यानंतर कपड्याचे डिझाइन चोरल्याच्या संशयावरून अपहरण करून शिंप्याकडे एक लाख रुपये खंडणीची मागणी केल्याच्या आरोपाखाली तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी हातोडी, बांबू व पट्ट्याने तक्रारदाराला मारहाण केली व त्यानंतर त्याच्याकडील मोबाइल व रोख रक्कम काढून घेतल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तक्रारदार मोहम्मद शहाबुद्दीन शहादत अली अन्सारी (३७) व्यवसायाने शिंपी असून तो चारकोप इंडस्ट्रीयल इस्टेट येथे कामाला होता. अन्सारी बुधवारी ८ च्या सुमारास




कंपनीतून बाहेर पडला. त्यावेळी आरोपी सुनील ऊर्फ सॅम विकास दास व त्याचासोबत असलेल्या तीन साथीदारांनी त्याला अडवले व जबरदस्तीने रिक्षात बसवण्यात सांगितले. त्यानंतर चालत्या रिक्षामध्ये तक्रारदाराला मारहाण करून त्याच्याकडील मोबाइल व रोख रक्कम काढून घेतली. त्यानंतर तक्रारदाराला रिक्षातून मालवणी परिसरात नेण्यात आले. तेथे त्याला एका खोलीत डांबून ठेवण्यात आले. शेरवानीचे डिझाईन चोरल्याबद्दल त्याच्याकडे एक लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली. ती रक्कम दिल्यानतंर सोडू असे धमकावण्यात आले. यावेळी तक्रारदाराला हातोडी, बांबू व कमरेच्या पट्ट्याने मारहाण करण्यात आली. तेथून सुटका झाल्यानंतर तक्रारदाने शताब्दी रुग्णालयात उपचार घेतले व घडलेला प्रकार कांदिवली पोलिसांना सांगितला. तक्रारदार हा मुख्य आरोपी सुनील याच्याकडे शिवणकाम करायचा. तेथील नोकरी सोडल्यावर त्याने शेरवानीचे डिझाईन चोरल्याचा सुनीलला संशय होता. सुनीलसह त्याच्या तीन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध सुरू आहे.

# तोतया अधिकाऱ्याकडून तरुणाची फसवणूक





**मुंबई :** गुन्हे शाखेचे अधिकारी असल्याची बतावणी करून एका तोतयाने वडाळा येथील एका तरुणाची ५० हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत तरुणाने वडाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. वडाळ्यातील भीमवाडी परिसरात वास्तव्यास असलेल्या अंगनल जॉर्ज राजा (३३) याला काही दिवसांपूर्वी एका अज्ञात व्यक्तीने फोन केला होता. गुन्हे शाखेने तुमचे पार्सल ताब्यात घेतले असून यामध्ये काही अनधिकृत वस्तू सापडल्या आहेत, असे त्याला सांगण्यात आले. आपण कुठलेही पार्सल पाठवले नसल्याचे त्याने सदर व्यक्तीला सांगितले. मात्र यामध्ये नाव, पत्ता आधारकार्डची सर्व माहिती असल्याने तुमच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची भीती आरोपीने तरुणाला घातली. या प्रकरणातून बाहेर काढण्यासाठी आरोपीने तरुणाला एक लिंक पाठवली. या लिंकवर जाताच तरुणाच्या खात्यातील ५२ हजार रुपये हस्तांतरित झाले. यावेळी खात्री करण्यासाठी आरोपीने तरुणाला व्हिडीओ कॉल सुरू ठेवण्यास सांगितले. मात्र पैसे मिळताच आरोपीने फोन बंद केला. काही वेळानंतर आपली फसवणूक झाल्याचे तरुणाच्या लक्षात आहे. त्याने याबाबत सायबर पोलिसांकडे ऑनलाईन तक्रार केली. या तक्रारीची दखल घेत वडाळा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला.

## ठाण्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांना निलंबनाबाबत तूर्त दिलासा नाही, राज्य सरकारला राक्षे यांच्या याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश



**मुंबई :** बदलापूर येथील शाळेच्या आवारात दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर निलंबित करण्यात आलेले ठाण्याचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी केलेल्या याचिकेवर उच्च न्यायालयाने शुक्रवारी राज्य सरकारला आठवडाभरात भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. यावेळी, राक्षे यांनी निलंबनाच्या निर्णयाबाबत अंतरिम दिलासा देण्याची मागणी केली. मात्र, सरकारच्या उत्तरानंतर या मागणीबाबत विचार करू, असे न्यायालयाने स्पष्ट केले. राक्षे यांनी निलंबनाच्या निर्णयाला आव्हान दिले असून आपल्याला या प्रकरणी नाहक गोवण्यात आले आहे. तसेच, आपल्यावरील निलंबनाची कारवाई ही राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचा दावा केला आहे. राक्षे यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती अनिल चांदूरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. त्यावेळी, राक्षे यांच्याविरुद्ध कोणतीही तक्रार नसताना आणि घटनेची दखल घेऊन त्यांनी योग्य तो अहवाल तयार करून शिक्षण संचालकांना पाठवला असताना सरकारने केवळ स्वत:ला वाचवण्यासाठी राक्षे यांच्यावर नाहक निलंबनाची कारवाई केली, असा दावा त्यांच्या वतीने वकील सतीश तळेकर यांनी केला. तसेच, निलंबनाच्या कारवाईबाबत शिक्षण मंत्र्यांनी आधी प्रसिद्धीमाध्यमांना माहिती दिली. त्यानंतर, राक्षे यांना निलंबनाबाबत कळवण्यात आल्याचेही तळेकर यांनी न्यायालयाला सांगितले. राक्षे यांच्या निलंबनाचा आदेश रद्द करण्याची मागणी तळेकर यांनी केली. न्यायालयाने याचिकेवर थोडक्यात युक्तिवाद ऐकल्यानंतर राज्य सरकारला राक्षे यांनी केलेल्या आरोपांबाबत आठवडाभरात उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले. त्यावेळी, तोपर्यंत निलंबनाच्या कारवाईबाबत दिलासा देण्याची मागणी राक्षे यांच्यातर्फे करण्यात आली. त्यावर, पुढील सुनावणीच्या वेळी विचार केला जाईल, असे सांगून न्यायालयाने सुनावणी स्थगित केली. दरम्यान, राक्षे यांनी सुरुवातीला महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे (मॅट) निलंबनाच्या निर्णयाला आव्हान दिले होते. परंतु, न्यायाधिकरणाने कोणताही दिलासा न दिल्याने राक्षे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तसेच, निलंबनाच्या कारवाईला स्थगिती देण्याची, अर्जावर अंतिम निर्णय दिला जाईपर्यंत या पदी अन्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यापासून सरकारला मज्जव करण्याची मागणी केली आहे. पूर्वप्राथमिकच्या नियमन आणि पर्यवेक्षणाशी संबंधित नसतानाही आपले निलंबन करण्यात आले. त्यामुळे, निलंबनाचा राज्य सरकारचा निर्णय मनमानी, भेदभाव करणारा आणि चुकीचा आहे. हा निर्णय राजकीयदृष्ट्या प्रेरित असून त्याद्वारे आपल्याला या सगळ्या प्रकरणात नाहक गोवण्यात आल्याचा दावा राक्षे यांनी याचिकेद्वारे केला आहे.

## वर्सोवा पुलावरून दाम्पत्याची उडी; पतीला वाचवले, पत्नीचा शोध सुरू



**भाईंदर :** मुंबई आमदाबाद महामार्गावरील वर्सोवा पुलावरून एका दाम्पत्याने उडी मारल्याची घटना घडली आहे. यात पतीला वाचवण्यात यश आले आहे. मात्र महिला खाडीत बुडाल्याने अग्निशमन विभागामार्फत बचाव कार्य राबविण्यात येत आहे. गुरुवारी सकाळी ९ च्या सुमारास ही घटना घडली. शशिकला यादव (२८) असे खाडीत बुडालेल्या महिलेचे नाव आहे. ती नायगावची रहिवासी आहे. तीन दिवसांपूर्वीच उत्तर प्रदेश राज्यातून पती दिनेश यादवकडे आली होती. गुरुवारी सकाळी पती पत्नी मध्ये वाद झाल्यानंतर ती वर्सोवा पुलावर आत्महत्या करण्यासाठी गेली. यावेळी तिची समजूत काढण्यासाठी तिची मावशी देखील तिच्या मागे गेली. दरम्यान, पतीला येत असल्याचे पाहून शशिकलाने पुलावरून खाडीत उडी मारली. ते पाहून पती दिनेशने देखील उडी मारली. स्थानिकांनी दोरखंडाच्या मदतीने पतीला वाचवले. मात्र शशिकला पाण्यात वाहून गेली. अग्निशमन दलाच्या मदतीने तिचा शोध सुरू आहे. यादव दाम्पत्याला ३ महिन्यांचे तान्हे बाळ असून ३ वर्षांचा मुलगा आहे.

## राज्यातील आयटीआयमध्ये आत्मसंरक्षणाचा वर्ग भरणार, राज्यातील महिलांसाठी हर घर दुर्गा अभियान

**मुंबई :** राज्यातील प्रत्येक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये (आयटीआय) ३हर घर दुर्गा अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना वर्षभर आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षणाच्या खास तासिकेप्रमाणेच मुलींसाठी आत्मसंरक्षण प्रशिक्षणासाठी



राखीव तासिका असावी, यासाठी राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पुढाकार घेतला होता. शारीरिक शिक्षणाप्रमाणेच वर्षभर महिलांसाठी कराटे, जुडो यांसारख्या स्वसंरक्षणाच्या पायाभूत प्रशिक्षणाच्या आठवड्यातून कमीत कमी २ तासिका घेण्यात येणार आहेत. त्याद्वारे आपत्कालीन आणि आव्हानात्मक परिस्थितीत सक्षमपणे लढण्याची ताकद महिलांना देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण देण्यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार असून, विद्यार्थिनींना नियमित सरावासाठी उद्युक्त करण्यात येणार आहे. राजमाता जिजाऊ आणि पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आदींचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन महाराष्ट्रातील घरोघरी अन्यायाविरुद्ध लढणारी दुर्गा असावी या उद्देशाने हर घर दुर्गा अभियान सुरू करीत आहोत, असे मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

## इमारतीमध्ये जाण्यास रोखल्याने सुरक्षा रक्षकाची हत्या

**मुंबई :** इमारतीच्या आवारात जाण्यास नकार दिल्याने एका व्यायाम शाळेतील प्रशिक्षकाने कर्तव्यावरील सुरक्षा रक्षकाला जबर मारहाण करून त्याची हत्या केल्याची घटना भांडुप परिसरात घडली आहे. याबाबत भांडुप पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. शिवाजी बारवे (६०) असे या मृत सुरक्षा रक्षकाचे नाव असून ते भांडुपच्या ड्रीम सोसायटीमध्ये गेल्या पाच वर्षांपासून सुरक्षा रक्षक म्हणून काम करीत होते. याच सोसायटीमध्ये एक व्यायामशाळा असून आरोपी विशाल गावडे या व्यायामशाळेत काही वर्षांपासून प्रशिक्षक म्हणून काम करीत होता.




बुधवारी रात्री आरोपी या सोसायटीमधील व्यायामशाळेत जाण्यासाठी आला होता. यावेळी शिवाजी बारवे कर्तव्यावर होते. त्यांनी गावडेला व्यायामशाळेत जाण्यापासून रोखले. यामुळे संतप्त झालेल्या गावडेने गारवे यांना मारहाण केली. त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

# गोरेगाव मुलुंड जोडरस्ता प्रकल्पाचा खर्च अडीचशे कोटींनी वाढला

**मुंबई** : गोरेगाव -मुलुंड जोडरस्ता प्रकल्पांतर्गत गोरेगाव येथील चित्रनगरी ते पूर्व उपनगरांतील मुलुंड येथील खिंडीपाड्यापर्यंत जुळा व भूमिगत बोगदा बांधण्यात येणार असून या बोगद्याचा खर्च २५० कोटी रुपयांनी वाढणार आहे. हळबेपाडा येथे टीबीएम यंत्रासाठी खड्डा खणण्यासाठी जमीन देण्यास आदिवासींनी विरोध केला असून आता टीबीएम यंत्रासाठी ६०० मीटर दूरवर खड्डा खोदावा लागणार आहे. त्यामुळे प्रकल्पाचा आधीच दुप्पट वाढलेला खर्च २५० कोटी रुपयांनी वाढणार आहे. जुलै महिन्यात या बोगद्याच्या कामाचे पंतप्रधानांच्या हस्ते भूमीपूजन करण्यात आले होते. मुंबईतील पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारे सांताक्रूझ -चेंबूर, अंधेरी -घाटकोपर, जोगेश्वरी-विक्रोळी हे तीन जोडरस्ते आहेत. मात्र दोन्ही उपनगरांमधील वाढती लोकसंख्या, वाहनांची वर्दळ यामुळे या रस्त्यांची क्षमता संपुष्टात आली आहे. त्यामुळे महानगरपालिकेने चौथा पर्यायी रस्ता तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. पश्चिम आणि पूर्व उपनगरांना जोडण्यासाठी महानगरपालिकेने गोरेगाव - मुलुंड जोडरस्ता प्रकल्प हाती घेतला आहे. सुमारे १२.२० किलोमीटर लांबीच्या या रस्त्यामुळे गोरेगाव -मुलुंड अंतर अत्यंत कमी वेळेत गाठणे शक्य होणार आहे. अत्यंत गुंतागुंतीच्या या प्रकल्पाची मांडणी चार टप्प्यांत करण्यात आली आहे. त्यापैकी तिसऱ्या टप्प्यांतर्गत पश्चिम उपनगरांमध्ये गोरेगाव येथील चित्रनगरी ते पूर्व उपनगरांमधील मुलुंड येथील खिंडीपाड्यापर्यंत जुळा व भूमिगत बोगदा बांधण्यात येणार आहे. या बोगद्याच्या बांधकामाचे कंत्राट जे कुमार-एनसीसी यांना देण्यात आले



आहे. प्रत्येकी तीन मार्गिका असणारा हा जुळा बोगदा साकारण्यासाठी एकूण ६० महिन्यांचा म्हणजेच ५ वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे. तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळ हा संपूर्ण बोगदा असल्यामुळे यात स्फोटके वापरता येणार नाहीत, तर अत्याधुनिक टनेल बोअरिंग यंत्राच्या (टीबीएम) माध्यमातून तो खणला जाणार आहे. मात्र टीबीएम यंत्र जमिनीखाली उतरवण्यासाठी शाफ्टची आवश्यकता असून त्याकरीता चित्रनगरीतील हळबेपाडा येथील जागेची निवड करण्यात आली होती. मात्र या पाड्यावरील आदिवासींनी त्यास विरोध केला होता. गेले आठ महिने या आदिवासींची मनधरणी करण्यात पालिका प्रशासनाची कसोटी लागली होती. मात्र आपले उपजीविकेचे साधन जाईल या भीतीने आदिवासींनी जमिनी देण्यास नकार दिल्यामुळे अखेर पूल विभागाने आता शाफ्टची जागा बदलण्याचे ठरवले आहे. यासाठी ६०० मीटर पश्चिम दिशेला जागा निश्चित करण्यात आली असून त्यामुळे प्रकल्पाचा खर्च २५० कोटी रुपयांनी वाढणार असल्याची माहिती पालिकेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. एकमेकांना समांतर असे हे जुळे बोगदे प्रत्येकी ४.७० किलोमीटर व्यासाचे असतील. संजय गांधी राष्ट्रीय अभयारण्य परिसरात त्यांचा अंतर्गत व्यास १३ मीटरचा असेल. हा बोगदा अभयारण्याच्या डोंगराखाली २० ते १६० मीटर खोलीवरून खणला जाणार होता, आता त्याची जागा थोडी सरकरणार आहे. या कामाचा अंदाजित खर्च ६२७१ कोटी गृहीत धरण्यात आला. निविदा प्रक्रियेत जेकुमार-एनसीसी यांनी ६,३०१ कोटींची सर्वात कमी किमतीची बोली लावली होती. मात्र या कामाचा जो अंतिम प्रस्ताव तयार करण्यात आला त्यात कामाचा एकूण खर्च तब्बल १२ हजार कोटींवर गेला आहे. प्रकल्पासाठी कास्टिंग यार्ड म्हणून १० हेक्टर जमीन भाड्याने घ्यावी लागणार आहे. प्रकल्पाच्या जवळ एवढी मोठी जागा नसल्यामुळे वाहतुकीचाही खर्च वाढला आहे. वस्तूचे वाढीव दर, डॉलरच्या दरात झालेली वाढ, वस्तू व सेवा करात झालेली वाढ, आंतरराष्ट्रीय वस्तू आणि सेवा कराचा प्रभाव यामुळे खर्चात वाढ झाल्याची कारणे प्रशासनाने प्रस्तावात दिली होती. जमिनीखाली बोगदा खणताना प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणी, भूगर्भीय आव्हाने, बोगद्याच्या रस्त्याखाली असणाऱ्या जलवाहिन्या, अन्य उपयोगिता वाहिन्या स्थापित करणे, प्रचालन व देखभाल कालावधीत केलेली वाढ यामुळे अंदाजित खर्चात वाढ झाल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

# ऑडीला ओलाची धडक; संतप्त कारचालकाने थेट उचलून आपटलं

**मुंबई** : मुंबईतील पार्कसाइट पोलिसांनी २४ वर्षीय ओला चालकाला मारहाण केल्याप्रकरणी घाटकोपरमधील रहिवासी बिभाष चक्रवर्ती आणि त्याची पत्नी अंतरा घोष यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचं सीसीटीव्ही फूटेज समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. या सीसीटीव्ही फूटेजमध्ये स्पष्ट दिसतंय की एका मारुती अर्टिगा कारने ऑडी कारला हलकी धडक दिली. ज्यामध्ये ऑडीला किरकोळ स्क्रॅच आलेले असू शकतात. मात्र या धडकेनंतर ऑडी कारमधील तरुण बिभाष कारमधून उतरला. त्याने मागे जाऊन ओला कारचालकाशी वाद सुरू केला. त्यानंतर बिभाषने ओला कारचालकाच्या कानशिलात लगावली आणि त्याला उचलून जमिनीवर आपटलं. ही घटना १९ ऑगस्टची आहे. मात्र या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ आता व्हायरल होऊ लागला आहे. बिभाषने ओला



कारचालकाला जबर मारहाणही केली. या मारहाणीत कारचालक कयामुद्दीन कुरैशी जखमी झाला आहे. मुंबईच्या जे. जे. रुग्णालयात कुरैशीवर उपचार केले जात आहेत. घटनेच्या दोन दिवसांनंतर बुधवारी २१ ऑगस्ट रोजी कुरैशी शुद्धीवर आला. त्यानंतर पोलिसांनी त्याचा जबाब नोंदवला. याप्रकरणी पोलिसांनी बिभाष चक्रवर्ती याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सीसीटीव्ही फूटेजमध्ये दिसतंय की बिभाषने कयामुद्दीन मोइनुद्दीन कुरैशी याच्या कानशिलात लगावली, नंतर त्याला उचलून जमिनीवर आपटलं. बिभाषने कयामुद्दीनला उचलून आपटल्यानंतर कयामुद्दीन बराच वेळ जमिनीवर निपचित पडला होता. त्यानंतर त्याला इतर लोकांनी रुग्णालयात दाखल केलं. सीसीटीव्ही व्हिडीओत दिसतंय की पांढऱ्या रंगाची ऑडी पुढे जातेय व एक राखाडी रंगाची मारुती अर्टिगा ऑडीच्या मागून येत आहे. त्याचवेळी ऑडीचालकाने ब्रेक मारून कार थांबवली. मात्र मागून येणाऱ्या अर्टिगाचा चालक त्याची कार लगेच थांबवू शकला नाही. अर्टिगाने ऑडीला हलकी धडक दिली. त्यानंतर ऑडीमध्ये बसलेला बिभाष कारमधून उतरला आणि अर्टिगाच्या दिशेने चालू लागला. तोवर कयामुद्दीन देखील अर्टिगामधून उतरला कयामुद्दीन काहीतरी बोलणार येवढ्यात बिभाषने त्याच्या कानशिलात लगावली. त्यानंतर त्याने कयामुद्दीनला उचलून जमिनीवर आपटलं. बिभाषने ओला चालक कयामुद्दीनला जमिनीवर आपटल्यानंतर कयामुद्दीन बेशुद्ध पडला. त्यावेळी बिभाष व त्याची पत्नी बाजूलाच उभे होते. दोघे काहीतरी बोलताना दिसत आहेत. दरम्यान, व्हायरल व्हिडिओ आणि कयामुद्दीनने पोलिसांना दिलेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी बिभाष व त्याच्या पत्नीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव



मीरारोड येथील अतिशय सुप्रसिद्ध सेलिब्रिटी मॅनेजर शशी लोहारुका यांनी यावेळी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा मोठ्या थाटात साजरा केला. बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध अभिनेता प्रतीक शुक्ला आणि सुप्रसिद्ध गायक डॉ शशी सरगम यांनी आशीर्वाद घेण्यासाठी भेट दिली आणि त्यांनी भगवान श्री कृष्णाची भक्तिगीतेही गायली. अनेक भक्त भगवान श्री कृष्णाचे सुंदर झाकीचे दर्शन घेतात.

# शंभर रुपये आणि मोबाईलसाठी १३ वर्षीय मुलाची अपहरण करून हत्या

**ठाणे :** भिवंडी येथे अवघ्या १०० रुपये आणि मोबाईलसाठी विनोद पागे या १३ वर्षीय मुलाची अपहरण करून हत्या करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी नितीन वाघे (४०), पद्माकर भोईर (२०) आणि अजय मांजे (२१) यांना अटक केली आहे. भिवंडी येथील ईर्‍याचा पाडा परिसरात विनोद हा वास्तव्यास होता. शहापूर येथील आश्रम शाळेत इयत्ता नववीमध्ये तो शिक्षण घेत होता. त्याच्या वडिलांचे निधन झाल्याने तसेच आईने दुसरा विवाह केला. त्यामुळे त्याला कुटुंबियांनी शिकण्यासाठी आश्रम शाळेत ठेवले होते. काही महिन्यांपूर्वी त्याला त्याच्या आईने १५ हजार रुपये किमतीचा मोबाईल घेऊन दिला होता. रक्षा बंधनाचा सण असल्याने तो त्याच्या काकांकडे राहण्यासाठी आला होता. १८ ऑगस्टला त्याला काकांनी खरेदीसाठी १०० रुपये देऊन बाजारातून साहित्य आणण्यास सांगितले. रात्री उशीरपर्यंत तो घरी आला नव्हता. दुसऱ्या दिवशी त्याच्या काकांनी आश्रम शाळेत विचारणा केली असता, तो आश्रम शाळेत देखील परतला नव्हता. अखेर २१ ऑगस्टला त्याच्या काकांनी तो बेपत्ता असल्याची तक्रार पडघा पोलीस ठाण्यात दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पडघा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही तपासले. त्यावेळी दुचाकीवर विनोदला एक व्यक्ती नेत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी दुचाकी क्रमांकाच्या आधारे माहिती घेतली असता, तो व्यक्ती नितीन वाघे असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी वाघे याला २४ ऑगस्टला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याने इतर दोघांच्या मदतीने त्याचा खून केल्याची कबूली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याचे साथिदार पद्माकर आणि अजय या दोघांनाही ताब्यात घेतले. तिघांनाही पडघा पोलिसांनी अटक केली आहे. हत्येनंतर त्यांनी विनोदचा मृतदेह वाडा येथील माळरानात फेकून दिला होता. त्याचा मृतदेह पोलिसांना आढळून आला आहे. विनोद हा मोबाईल घेऊन बाजारात गेला होता. बाजारात जाण्यासाठी विनोद याने नितीन याची दुचाकी थांबवून बाजारात सोडण्याची विनंती केली. परंतु त्याने त्याला वाडा येथील माळरानात नेले. तिथे नितीन आणि त्याच्या साथिदारांनी त्याचा गळा आवळून हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह माळरानात फेकून दिला. तसेच त्याचा मोबाईल आणि १०० रुपये घेऊन तेथून निघून गेले.

# दोन दलालांच्या हत्येप्रकरणी पाच जणांना अटक


**नवी मुंबई :** रायगड जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी मृतावस्थेत आढळलेल्या दोन दलालांच्या हत्येचा उलगडा झाला असून पोलिसांनी याप्रकरणी पाच जणांना अटक केली आहे. जमिनीच्या व्यवहारातून हा प्रकार घडल्याचे तपासात समोर आले असून यातील एक मृत दलाल सुमित जैन यानेच हा कट रचल्याचे समोर आले आहे. दुसऱ्या दलालाच्या हत्येनंतर सुपारीच्या पैशांवरून वाद झाल्याने जैन याचीही हत्या झाल्याचा पोलिसांचा संशय आहे. विठ्ठल नाकाडे, जयसिंग ऊर्फ राजा मधु मुदलीयार, आनंद कुज, वीरेंद्र कदम, अंकुश सीतापुरे अशी या आरोपींची नावे असून त्यांना ३१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सुमित जैन आणि आमिर अन्वर खानजादा अशी हत्या झालेल्या दलालांची नावे आहेत. हे दोघेही २१ ऑगस्ट रोजी नेरुळ येथून बेपत्ता झाले होते. त्यापैकी सुमित याचा मृतदेह मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गालगत खोपोलीनजीक आढळला होता. मात्र खानजादा याचा थांगपत्ता लागत नव्हता. त्यामुळे नवी मुंबईचे पोलीस सहआयुक्त संजय येनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, उपायुक्त अमित काळे, पंकज डहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा आणि परिमंडळ एक पोलीस यांची एकूण आठ तपास पथके तयार करण्यात आली होती. मृत सुमित आणि आरोपी विठ्ठल यांनी पाली येथे एका मृत व्यक्तीच्या नावे असलेली साडेतीन एकर जमीन कागदपत्रांचे फेरफार करून बळकावली आणि तिचा व्यवहार केला. या व्यवहारातील पैशाच्या वाटणीवरून त्यांच्यात तसेच आमिर याच्यात वाद होते. त्यामुळे आमिर याचा काटा काढण्याचा कट सुमित आणि विठ्ठल यांनी रचला. तसेच आनंद याला हत्येसाठी ५० लाखांची सुपारी देण्यात आली. २१ ऑगस्ट रोजी खोपोली येथील जमीन व्यवहार बैठकीचे कारण देत सुमित याने आमिरला आपल्या सोबत घेतले. यावेळी कारमध्ये असलेले आनंद आणि जयसिंग यांनी आमिर याची गोळ्या झाडून हत्या केली आणि त्याचा मृतदेह कर्नाळा येथे टाकला. आधी ठरल्याप्रमाणे, कारवर हल्ला झाल्याचे भासवण्यासाठी सुमित याने स्वत:च्या पायावर गोळी झाडून घेतली. मात्र, त्यानंतर आरोपी आणि सुमित यांच्यात सुपारीच्या पैशावरून वाद झाले आणि त्यांनी सुमितवर धारदार शस्त्राने वार केले. यात अतिरक्तस्त्रावामुळे सुमित याचा मृत्यू झाला. त्याचा मृतदेह पेण–खोपोली मार्गावर टाकून आरोपी पसार झाले, अशी माहिती अप्पर पोलीस आयुक्त दीपक साकोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे विठ्ठल या संशयितास ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीतून हत्येचा उलगडा झाला. त्यानंतर अन्य आरोपींना अटक करण्यात आली. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे कर्नाळा अभयारण्य परिसरात फेकलेला अन्वर याचा मृतदेह ताब्यात घेण्यात आला.

# भामट्यांनी डॉक्टर बनून महिलांना घातला गंडा, आशा सेविकांकडून घेतली माहिती

**वसई :** डॉक्टर असल्याचे भासवत दोन भामट्यांनी वसईतील काही महिलांना औषधांच्या नावाखाली गंडा घातला आहे. विशेष म्हणजे आशा सेविकांकडून त्यांनी ही माहिती मिळवली होती. याप्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई तालुक्यात जिल्हा परिषदेची प्राथमिक आरोग्य केंद्रे (पीएससी) आहेत. या केंद्राच्या अंतर्गत आशा सेविका काम करतात. त्या घरोघरी जाऊन शासनाच्या आरोग्य मोहिमा राबवत असतात. २२ ते २४ ऑगस्ट दरम्यान दोन इसमांनी पारोळ, भाताणे आणि शिवणसई प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशासेविका महिलांची भेट घेतली. आम्ही जिल्हा परिषद पालघर येथील डॉक्टर असल्याचे त्यांनी या आशा सेविकांना सांगितले. शासनाकडून व्यंधत्वावर उपचारासाठी औषधे आणल्याचे सांगून व्यंधत्व असलेल्या महिलांची माहिती मागितली. या आशा सेविका त्यांच्या भूलथापांना बळी पडल्या आणि त्यांनी काही महिलांची माहिती दिली. या भामट्या डॉक्टरांनी अशा महिलांची भेट घेऊन त्यांना संतान संजीवनी कल्पवटी चूर्ण पुडी, संभोग सम्राट कल्पवटी चूर्ण नावाच्या पुड्या १८ हजार रुपयांना विकल्या. नंतर ते डॉक्टर नसून भामटे असल्याचे लक्षात आले. याप्रकरणी पारोळ आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी संकेत हेगडे यांनी मांडवी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार मांडवी पोलिसांनी दोन अनोळखी इसमांविरोधात भारतीय न्याय दंड संहितेच्या कलम ३१८ (४), ३१९(२), २०४, ३(५)अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आम्ही या भामट्यांविरोधात गुन्हा दाखल केला असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांनी दिली.

# शाळेत खेळताना आठ वर्षांच्या मुलाचा मृत्यू

**मुंबई :** कांदिवली पूर्व येथील एका शाळेत शुक्रवारी खेळाचा तास सुरू असताना आठ वर्षांचा मुलगा आकडी (फिट्स) आल्यामुळे खाली कोसळला. त्याला तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले. मात्र रुग्णालयातील डॉक्टरांनी त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. समता नगर पोलिसांनी याप्रकरणी अपमृत्यूची नोंद केली असून शवविच्छेदन अहवालातून मृत्यूचे



खरे कारण स्पष्ट होणार आहे. कांदिवली पूर्व येथील एका शाळेतील इयत्ता तिसरीमध्ये शिवांश झा शिक्षण घेत होता. तो कांदिवलीत आपल्या पालकांसोबत राहत होता. शुक्रवारी दुपारी ३ च्या सुमारास त्यांच्या वर्गात खेळाचा तास सुरू होता. त्यासाठी विद्यार्थ्यांना खाली नेण्यात आले. तेथे उडी मारताना तो खाली कोसळला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाच्या तपासणीत झा याला आकडी येऊन तो खाली कोसळत असल्याचे निदर्शनास आले. शाळेतील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबाला याबाबत माहिती दिली आणि तात्काळ जवळच्या श्रीजी रुग्णालयात नेले. रुग्णालयाने त्यांच्या कुटुंबीयांना मुलाची स्थिती गंभीर असल्याचे सांगितले. नंतर त्याला कांदिवलीतील बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात हलविण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

# सातवीत शिकणाऱ्या विद्यार्थीनीला अश्लील चित्रीकरण दाखविल्या प्रकरणी शिक्षक अटकेत

**ठाणे :** भिवंडी महापालिकेच्या शाळेत इयत्ता सातवीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीला मोबाईलमध्ये अश्लील चित्रफीत दाखवून तिचा विनयभंग



करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ४० वर्षीय शिक्षकाला शांतीनगर पोलिसांनी अटक केली आहे. पिडीत मुलगी शाळेत जाण्यास टाळाटाळ करू लागल्यानंतर तिच्या पालकांनी याबाबत मुलीकडे विचारणा केली. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे. पिडीत मुलगी १२ वर्षीय असून ती भिवंडीमध्ये महापालिकेच्या शाळेत शिकते. मागील काही दिवसांपासून ती शाळेमध्ये जाण्यास टाळाटाळ करू लागली होती. तिच्या वडिलांनी याबाबत तिला विचारले असता, तिचे शिक्षक तिला मोबाईलमध्ये अश्लील चित्रीकरण दाखवित तिचा विनयभंग करत असल्याचे तिने सांगितले. यानंतर पालकांनी तात्काळ शांतीनगर पोलीस ठाणे गाठले. संबंधित शिक्षकाविरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी शिक्षकाला अटक केली आहे.

## संपादकीय

संपादक : अनिल राजाराम पवार

# बंदरविकासाचे वारे

समुद्राचे खरे महत्त्व ओळखणाऱ्या द्रष्ट्या महाराजांप्रती जाहीर माफी मागून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाढवण बंदर प्रकल्पाचे भूमिपूजन केले. मालवणमध्ये राजकोट किल्ल्यावर घडलेल्या घटनेनंतर छत्रपती शिवरायांची माफी मागणे हे अनिवार्यच होते. त्याचप्रमाणे मत्स्यव्यवसायातील भारताच्या प्रगतीचा आलेख मांडताना आदिवासी, मच्छिमार उपेक्षित राहू नयेत, यावरही पंतप्रधानांनी भाष्य केले. खासकरून पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर प्रकल्पाला मच्छिमार समुदायाकडून गेल्या अनेक महिन्यांपासून होत असलेला विरोध पाहता येथील स्थानिक जनतेच्या भावनांना साद घालणेही तितकेच आवश्यक होते. एखादा विशाल प्रकल्प आकाराला येतो, तेव्हा भूसंपादन ही त्यातील प्रमुख अडचण असते. त्याचप्रमाणे ज्या स्थानिक समुदायाची राहती जागा, शेत, गावठाण त्यांना सोडावे लागते, त्या जनतेचा संवेदनशीलपणे विचार व्हावा लागतो. आपल्याकडील अनेक प्रकल्पांमध्ये स्थानिकांच्या मागण्यांची तड वेळेत लागत नाही, त्यामुळे विरोधाचा सूर अधिक बळावतो. आपली स्थानिक संस्कृती, उदरनिर्वाहाचे साधन हे सर्व कसे जपले जाईल, याबाबत जोपर्यंत विश्वास दिला जात नाही, तोपर्यंत सरकार आणि जनतेत संवादाचा पूल बांधला जाऊ शकत नाही. वाढवण प्रकल्पाला इतकी वर्षे खीळ बसली होती, त्यात ही सर्व कारणे होतीच. आजही विरोध पुरता शमलेला नाही. १९९७ पासून हा प्रकल्प कागदावर येऊनही तो काही पुढे जाऊ शकला नव्हता. या काळात आपली सागरी व्यापाराची गरज वाढत गेली आहे आणि भारताच्या तुलनेत इतर देशांनी मात्र बाजी मारण्यास सुरुवात केली. भारतभरात आजघडीला १२ प्रमुख बंदरे आहेत, तर ६४ छोटी बंदरे आहेत. मात्र कंटेनरवाहू जहाजांसाठी केवळ न्हावाशेवा येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण व मुंद्रा ही दोनच मोठी बंदरे वापरात आहेत. मोठ्या कंटेनर जहाजांना १२ ते २० मीटरची खोली आवश्यक असते. मुंबई बंदरात वारंवार गाळ साचतो, त्यामुळे जेएनपीएमध्ये मोठी कंटेनर जहाजे आणण्याला मर्यादा येतात. या सर्व मर्यादा नसल्याने वाढवण येथे ७६ हजार कोटींचा विशाल बंदर प्रकल्प उभारण्याचे ठरले आहे. जेएनपीए व मुंद्रा या दोन्ही बंदरांची कंटेनरहाताळणीची एकूण क्षमता १४ दशलक्ष कंटेनरची आहे. याउलट चीनमधील सर्व बंदरांची मिळून कंटेनरहाताळणीची क्षमता २५० दशलक्ष कंटेनर इतकी आहे. सिंगापूर व शांघाय या बंदरांनी ४० ते ४५ दशलक्ष टन इतकी कंटेनरहाताळणी करीत बाजी मारली आहे. कोलंबोही सध्या आघाडीवर आहे. त्यामुळे भारताकडे मोठी जहाजे येण्याचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. भारतीय बंदरातील मालाच्या चढ-उताराला लागणारा विलंब हीसुद्धा एक मोठी समस्या आहे. एकूणच गेल्या अनेक वर्षात भारतीय किनारपट्टीची क्षमता पूर्णत: वापरण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. रायगड जिल्ह्यातील दिघी बंदराच्या १० हजार कोटींच्या विकासाबरोबरच आता तेथे औद्योगिक केंद्र विकासाची योजना दोनच दिवसांपूर्वी जाहीर करण्यात आली. वाढवणच्या बारमाही बंदराची क्षमता सुमारे २३ दशलक्ष कंटेनरहाताळणीची आहे. रायगड व पालघर या जिल्ह्यांमधील बंदरविकासाला व्यापारउदिमाच्या दृष्टीने चालना देण्याची नितांत आवश्यकता आहे. मात्र केवळ हजारो कोटींचे बंदर प्रकल्प घोषित करून भागणार नाही. या प्रकल्पांची पुढची व मागची द्वारेही तितकीच प्रशस्त असायला हवीत. म्हणजे बंदरात जहाज आले, तरी तिथपर्यंत येणारे रस्ते व रेल्वेमार्ग सक्षम असायला हवेत. आजवर त्याची वानवा आहे. उरणकडून येणारा कंटेनरवाहू ट्रक रस्तेमार्गे अहमदाबाद, दिल्लीकडे जाईपर्यंत कित्येक दिवस लागतात. गुजरातेतील कांडला, मुंद्रा, हाजिरा या सर्व बंदरांनी प्रशस्त महामार्गाच्या जोरावर व्यापार वाढविला. महाराष्ट्रात मात्र याबाबतीत शोचनीय स्थिती आहे. प्रकल्प म्हणजे केवळ भूखंडांचे व्यवहार असे मानण्याचा रोग महाराष्ट्राला जडला आहे. जमिनींच्या व्यवहारांवरून तंटेबखेडे-दलाली, जागा मोकळी करण्यासाठी किंवा त्यावर काम करण्यासाठीच्या कंत्राटांमध्ये गैरव्यवहार, लोकांना रोजगार देण्याचे कंत्राट मिळवितानाही मलिदा अशा सर्व गोष्टींमुळे आपल्या राज्यातील प्रगती खुंटत राहिली आहे. प्रकल्पबाधितांच्या मुलांना कौशल्यप्रशिक्षण देऊन तेथेच रोजगार देण्याबाबत मात्र राजकीय अनास्था असते. पर्यावरण परवानग्या ही केवळ औपचारिकता न मानता संभाव्य धोके टाळण्यासाठी उपाययोजना करणे यात शहाणपण ठरेल. व्यापारउदिमाचा वेग वाढवायचा, तर मालाच्या पुरवठ्याची साखळी अधिक जलद व्हावी लागेल. जलवाहतूक हे आजवरचे सर्वात स्वस्त साधन ठरले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची आराध्य दैवत म्हणून उपासना करताना, त्यांनी घालून दिलेला समुद्रमंत्रही आत्मसात करावा लागेल.

# एमपीएससी मंत्र : राज्यसेवा मुख्य परीक्षा -प्राकृतिक भूगोल



राज्य सेवा मुख्य परीक्षेच्या भाषा विषयांच्या तयारीबाबतची चर्चा मागील लेखामध्ये करण्यात आली. राज्यसेवा मुख्य परीक्षेचा पेपर तीन म्हणजे सामान्य अध्ययन पेपर एक मधील भूगोल घटकाच्या तयारीबाबत या व पुढील लेखांमध्ये चर्चा करण्यात येत आहे. यातील प्राकृतिक घटकाबाबत या लेखामध्ये पाहू.

**भूरूपशास्त्र**

प्राकृतिक भूगोलामधील संकल्पना व मुद्दे हे भूरूप निर्मितीशी संबंधित घटक म्हणून अभ्यासणे आयोगाला अपेक्षित आहे. त्यामुळे या घटकांची भूरूप निर्मितीमधील भूमिका तयारी करताना जास्त महत्त्व देऊन अभ्यासावी लागणार आहेच. पण त्यांचा मूलभूत अभ्यासही तेवढाच महत्त्वाचा आहे. या घटकांचा व्यवस्थित संकल्पनात्मक अभ्यास झाल्याशिवाय त्यांची भूरूप निर्मितीमधील भूमिका समजून घेता येणार नाही हे लक्षात घ्यायला हवे.

पृथ्वीचे अंतरंग- रचना आणि घटना -अंतर्गत व बहिर्गत शक्ती, खडक व खनिजे हे मुद्दे भूमी स्वरूपांच्या उत्क्रांतीवर परिणाम करणारे घटक म्हणून अभ्यासायचे आहेत. पृथ्वीचे अंतरंग अभ्यासताना तिच्या अंतर्भागाची रासायनिक व भौतिक रचना, त्यांची वैशिष्ट्ये, वितरण आणि त्यामुळे तयार होणाऱ्या अंतर्गत शक्ती असे मुद्दे यामध्ये पहायला हवेत. खडक, खनिजे यांचा परिणामही व्यवस्थितपणे समजून घ्यायला हवा.

या व्यतिरिक्त भूमी स्वरूपांच्या विकासावर ज्या घटकांचा परिणाम होतो, ज्यांची महत्त्वाची भूमिका असते त्यांचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. यामध्ये मूळ स्त्रोताचा उठाव/ उंची, खडकांची भौगोलिक रचना, हवामान, ऊर्जा, जैविक क्रिया आणि मानवी क्रिया यांचा समावेश होतो. या घटकांचा भूरूप निर्मितीवरील परिणाम समजून घ्यायला हवा.

भूरूपचक्रांची संकल्पना हा मुद्दा बहिर्गत शतींचे कार्य या घटकांतर्गत येईल. यामध्ये नदी, हिमनदी, वारा व सागरी लाटांशी संबंधित भूमी स्वरुपे अभ्यासायची आहेत. या कारक घटकांच्या विदरण आणि संचयनाच्या कार्यातून विकसित होणारी भूरूपे आणि त्यामध्ये समाविष्ट भूरूपकीय प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. शक्य असल्यास भूरूपांच्या आकृत्यांसह टेबलमध्ये नोट्स काढाव्या. त्यामुळे आकृत्यांचा प्रश्न व्यवस्थित सोडवता येईल.

भारतीय उपखंडाची उत्क्रांती कशी झाली याचा भूरूपशात्रीय मुद्द्यांच्या आधारे अभ्यास करायला हवा. भारताचे प्रमुख प्राकृतिक विभाग- हिमालयीन प्रदेश, उत्तरेकडील मैदानी प्रदेश, द्वीपकल्पीय पठार, वाळवंट, किनारी प्रदेश व बेटे यांचे स्वरुप, विस्तार, रचना, वैशिष्ट्ये, भौगोलिक व हवामानशास्त्रीय महत्त्व, आर्थिक महत्त्व हे पैलू अभ्यासायला हवेत. यामधील नदीप्रणाली व पर्वतप्रणालींचा अभ्यास दक्षिण उत्तर आणि पूर्व पश्चिम अशा क्रमाने केल्यास परिणामकारक ठरेल.

महाराष्ट्र राज्याची प्राकृतिक रचना आणि येथील भूरूपकीय वैशिष्ट्ये अभ्यासताना नदी व पर्वत प्रणालींचा उत्तर ते दक्षिण अशा क्रमाने सलगता लक्षात घेऊन अभ्यास करावा. या ठळक भूरूपांनंतर महाराष्ट्रातील नैसर्गिक भूदृष्ये/ भूमीस्वरुपे टेकड्या, कटक, पठारी प्रदेश, कुंभगर्ता, धबधबे, उष्ण पाण्याचे झरे, पुळण यांचा आढावा घ्यावा. यामध्ये अशा भूरूपांचे स्थान, वैशिष्ट्ये, भौगोलिक तसेच पर्यटनातील महत्त्व असे मुद्दे लक्षात घ्यावेत.

**हवामानशास्त्र**

वातावरण -वातावरणाची संरचना, घटना व विस्तार अभ्यासताना त्याचे ऋतू व हवामानावरील परिणाम समजून घ्यायला हवेत.

हवा व हवामानाची अंगे अभ्यासताना तापमान, आर्द्रता, पर्जन्यमान, वायुदाब, वारे हे महत्त्वाचे घटक व त्यांचा हवामानावरील परिणाम यांतील संकल्पनात्मक भाग महत्त्वाचा आहे. कार्यकारण संबंध जोडून या संकल्पनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

सौर ऊर्जा- पृथ्वीपृष्ठारील उष्णतेचे संतुलन, तापमान- पृथ्वीपृष्ठारील तापमानाचे ऊर्ध्व व क्षितिजसमांतर वितरण या मुद्द्यांचा अभ्यास उष्णतेच्या संतुलनावर परिणाम करणारे घटक, संतुलनाचा परिणाम, तापमानाच्या वितरणास कारक घटक व त्याचा परिणाम समजून घेऊन करावा.

हवेचा दाब, वारे, ग्रहीय व स्थानिक वारे यांचे कारक घटक व परिणाम समजून घ्यावेत.

मोसमी वारे(मान्सून), पर्जन्याचे वितरण, अवर्षण व पूर व त्यांच्याशी निगडीत समस्या यांचा महाराष्ट्रापुरता भाग अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट असला तरी भारतीय पर्जन्याचा आढावा घेणे या मुद्द्यांच्या आकलनासाठी आवश्यक आहे.

मान्सूनची निर्मिती, ऋतूंची निर्मिती, समुद्री प्रवाह, भूकंप, ज्वालामुखी इ. वेगवेगळ्या घटाकांमध्ये समाविष्ठ भौगोलिक प्रक्रियांच्या अभ्यासामध्ये पुढील मुद्दे समजून घ्यायला हवेत.

भौगोलिक व वातावरणीय पार्श्वभूमी ; घटना घडू शकते/ घडते ती भौगोलिक ठिकाणे प्रत्यक्ष घटना/ प्रक्रियेचे स्वरूप; घटनेचे/ प्रक्रियेचे परिणाम; पर्यावरणीय बदलांमुळे घटनेवर/ प्रक्रियेवर होणारे परिणाम; असल्यास आर्थिक महत्त्व; भारतातील, महाराष्ट्रातील उदाहरणे; नुकत्याच घडलेल्या महत्त्वाच्या घटना/ प्रक्रिया

# ठाण्यात भाजप, ठाकरे गटाचा संयुक्त मोर्चा ? कोलशेतमध्ये स्थानिकांच्या रोजगारासाठी ग्रामस्थांनी काढला मोर्चा

**ठाणे :** कोलशेत भागातील स्थानिकांच्या रोजगारासाठी शनिवारी ग्रामस्थानी काढलेल्या मोर्चामध्ये भाजप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांचे नेते सामील झाले होते. एकमेकांचे कट्टर विरोधक असलेल्या या दोन्ही पक्षांचे नेते मोर्चात एकत्रितपणे दिसून आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून यानिमित्ताने शहरातील राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहेत. कोलशेत भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी अनेक वर्षांपूर्वी कंपन्यांकडून मातीमोल किंमतीत ताब्यात घेण्यात आल्या. त्यानंतर या कंपन्यांच्या व्यवस्थापनाने कंपन्या बंद करून बिल्डरांना नफा कमवून जागांची विक्री केली. या बिल्डरांकडून मोठमोठी संकुले आणि मॉल उभारले जात आहेत. परंतु या भागातील स्थानिक तरुण-तरुणींना रोजागार




दिला जात नसून, गुंडांच्या टोळ्या तैनात करून दहशत पसरविली जात आहे, असा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. स्थानिक भूमिपूत्रांना रोजगार नाकारला जात असल्याच्याविरोधात भूमिपूत्रांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून त्याविरोधात ग्रामस्थांनी संघटीत होऊन ओबेरॉय रियल्टीविरोधात गुरुवारी मोर्चा काढला. या मोर्चादरम्यान बिल्डरच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन स्थानिक तरुण-तरुणींना रोजगार देण्याची मागणी करण्यात आली. कोलशेतमधील स्थानिकांनी हा मोर्चा काढला असला तरी या मोर्चात भाजप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे नेते एकत्रितपणे सामील झाल्याचे चित्र दिसून आले. भाजपा जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, मनोहर डुंबरे, कविता पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. तर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे हेही उपस्थित होते. राज्याच्या राजकारणात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि भाजप हे दोन्ही पक्ष एकमेकांचे कट्टर विरोधक म्हणून ओळखले जातात. या दोन्ही पक्षांचे नेते एकमेकांवर आरोप, टीका आणि टिप्पणी करण्याची एकही संधी सोडत नाहीत. असे असतानाच, या दोन्ही पक्षाचे नेते कोलशेतमधील स्थानिकांच्या रोजगारासाठी काढलेल्या मोर्चात एकत्रितपणे दिसून आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून यानिमित्ताने शहरातील राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहेत. या संदर्भात ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख केदार दिघे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

कोलशेत भागातील स्थानिकांच्या रोजगारासाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात आमच्या पक्षाचे नेते सामील झाले होते. तसेच काही स्थानिकांनी ठाकरे गटाच्या नेत्यांना बोलविल्यामुळे तेही मोर्चात सामील झाले होते. त्यामुळे एकत्रित मोर्चा काढण्याचा प्रश्न येत नसून स्थानिक भूमिपुत्रांना न्याय मिळावा हा आमच्यासाठी महत्वाचा मुद्दा असल्याने त्यात आम्ही सहभागी झालो होतो.- मनोहर डुंबरे, भाजपचे माजी नगरसेवक

# भिरा प्रकल्पाचे पाणी आणा, मोरबे धरणाच्या जल पूजनानंतर नाईक यांचे वाढीव पाणी नियोजनाचे सूतोवाच

**नवी मुंबई :** मोरबे धरण हे नवी मुंबई शहराचा व नवी मुंबईकरांचा सन्मान आहे. परंतु आगामी काळात ४० लाख लोकसंख्येला पाणीपुरवठा करता येण्यासाठी भिरा प्रकल्पाचे पाणी आणण्याचे नियोजन करून सर्व नागरिकांना समप्रमाणात पाणीपुरवठा मिळालाच पाहिजे, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांना केली. मोरबे धरण १०० टक्के भरल्यामुळे गुरुवारी धरणावर जलपूजनाचे आयोजन केले होते. त्यावेळी नाईक यांनी भविष्यातील पाणी नियोजनाची मागणी केली. आता मोरबे धरणात २९ जुलै २०२५ पर्यंत म्हणजेच ३३५ दिवस पुरेल इतका पाणीसाठा झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात स्वत:च्या मालकीचे धरण असणारी नवी मुंबई



ही एकमेव महापालिका असून मोरबे धरणामुळे नवी मुंबई ही जलसमृध्द महानगरपालिका म्हणून ओळखली जाते. पाताळगंगा नदीची उपनदी असलेल्या धावरी नदीवर खालापूर तालुक्यात असलेले ४५० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचे मोरबे धरण पूर्ण भरले. त्यानिमित्ताने गणेश नाईक , महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते मोरबे धरण प्रकल्पस्थळी पारंपरिक पद्धतीने जलपूजन करण्यात आले. यावेळी माजी महापौर जयवंत सुतार, सुधाकर सोनावणे, विनोद म्हात्रे यांसह अनेक विभागांचे अतिरिक्त आयुक्त, अधिकारी उपस्थित होते. मोरबे धरण परिसरात आतापर्यंत या पावसाळ्यात ३३७४ मिमी पावसाची नोंद झालेली असून पाण्याची पातळी पूर्ण ८८ मीटर इतकी भरलेली आहे. धरणात १९१.४६३ दशलक्ष घनमीटर इतका जलसाठा असून त्यामधील पाण्याचा गुरुवारी जलपूजनाच्यावेळी मान्यवरांच्या हस्ते जलविसर्ग करण्यात आला. प्रत्येक वर्षी मोरबे धरणातील जलसाठा पूर्ण भरावा अशी मनोकामना करीत जलपूजन कार्यक्रम झाला.

मोरबे धरण यंदा ऑगस्टमध्ये पूर्ण भरले असून ही नवी मुंबईकरांसाठी आनंदाची गोष्ट असून ही निसर्गाची कृपा आहे. नवी मुंबईकरांना स्वच्छ, शुद्ध व पुरेसा पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील. सर्वच विभागांत समान पाणीवाटप करण्याबाबत उपायोयजना करण्यात येतील. -डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नमुंमपा



**उत्तर मुंबई मतदार संघातील खासदार व केंद्रीय वाणिज मंत्री श्री पियुष गोयलजी याना बांद्रा, बोरीवली कोल्हापूर बेळगांव छ. शाहू महाराज (अप-डाऊन) एक्सप्रेस चालू करण्या बाबत निवेदन देतेवेळी कोल्हापूर जिल्हा जनकल्याण संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष श्री मधूकर गोडसे , कार्याध्यक्ष श्री. अमर पन्हाळकर व संस्थेचे सचिव नामदेव पाटील, खजिनदार शिवाजी मारे, व इतर पदाधिकारी छायाचित्रात दिसत आहेत.**

# डोंबिवलीत सागावमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीला मारहाण करणाऱ्या खासगी शिकवणी चालिकेविरुध्द गुन्हा

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्वेतील मानपाडा रस्त्यावरील सागाव चेरानगर भागात एका खासगी शिकवणी चालिकेने एका सहा वर्षाच्या अल्पवयीन मुलीला अभ्यासात ढ असल्याच्या रागातून गुरुवारी मारहाण केली. मुलगी अल्पवयीन आहे, हे माहिती असुनही तिला समजून सांगण्याऐवजी खासगी शिकवणी चालिकेने आपल्या मुलीला मारहाण केली म्हणून अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी मानपाडा पोलीस ठाण्यात खासगी शिकवणी वर्गातील शिक्षके विरुध्द तक्रार केली आहे. सागाव मधील चेरानगर मधील रविकिरण सोसायटीमधील सुखशांती सोसायटीत हा प्रकार गुरुवारी सकाळी साडे अकरा वाजता घडला आहे. सारिका अमोल घाग असे खासगी शिकवणी चालिकेचे नाव आहे. ती या सोसायटीत लहान मुलांचे खासगी शिकवणीचे वर्ग घेते.




रविकारण सोसायटी मधील साईनाथ सोसायटीत राहणाऱ्या नितीन रघुनाथ नरूटे यांनी याप्रकरणी तक्रार केली आहे. ते बँकेत नोकरीला आहेत. पोलिसांनी सांगितले, तक्रारदार नितीन नरूटे यांची सहा वर्षाची अल्पवयीन मुलगी सारिका घाग यांच्या खासगी शिकवणीत अभ्यासासाठी जाते. ती दररोज साडे नऊ ते साडे अकरा वेळेत या वर्गात असते. तिचे आई, वडील तिला या वर्गात सोडतात. गुरुवारी खासगी शिकवणी वर्गात नितीन नरूटे यांची मुलगी अभ्यास करत होती. त्यावेळी शिक्षिका सारिका घाग यांनी तिला दिलेला अभ्यास पूर्ण केला नाही. यावरून रागावलेल्या सारिका यांनी नरुटे यांच्या मुलीला तुला अभ्यास का जमत नाही, तुला लिहिता का येत नाही. तू शिकवणी वर्गात अभ्यास का करत नाहीस, असे रागाने बोलून तिच्या हातावर छडीने मारले. तसेच, तिच्या कानाखाली चापट मारली. या घडल्या प्रकाराने अल्पवयीन मुलगी रडायला लागली. सर्व मुलांसमोर शिक्षिकेने मारल्याने ती अस्वस्थ झाली.खासगी शिकवणी वर्गात घडलेला प्रकार मुलीने घरी आई, वडिलांना सांगितला. पालकांनी घाग यांना जाब विचारला. मुलगी अल्पवयीन आहे. तिला समजून सांगण्याऐवजी मारहाण का केली, असे प्रश्न करून पालकांनी मानपाडा पोलीस ठाण्यात सारिका घाग यांच्या विरुध्द तक्रार केली आहे.

# शिल्पकार जयदीप आपटे यांच्या कल्याणमधील घराला काळे फासले; संभाजी ब्रिगेडची आपटेंच्या घरासमोर निदर्शने

**कल्याण :** मालवण राजकोट येथील शिवरायाचा पुतळा कोसळण्यास कारणीभूत असलेले येथील शिल्पकार जयदीप आपटे यांच्या घरासमोर गुरुवारी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली. यावेळी आपटे यांच्या बंद दरवाजाला काळे फासण्यात आले. शिल्पकार आपटे यांच्या प्रतीमेवर शिवद्रोही लिहून ती भित्तीचित्रे आपटे यांच्या दरवाजावर झळकवली. यावेळी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी शिल्पकार आपटे यांना पाठबळ देणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही टीका केली. जगाला अभिमान असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्यास या पुतळ्याच्या कामात झालेला गैरव्यवहार, निकृष्ट दर्जाचे काम या दोन मुख्य गोष्टी कारणीभूत आहेत. त्यामुळे निकृष्ट दर्जाचे काम करणांऱ्या शिल्पकार जयदीप आपटे यांना आम्ही धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. त्यांनी निकृष्ट काम



करून महाराजांना अपमान केला आहे, अशा शब्दात ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी आपटे यांचा निषेध केला. यावेळी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी आपटे यांच्या बंद असलेल्या घराच्या दरवाजाला काळे फासले. दरवाजा काळाकुट्ट केला. पुतळा कोसळल्याची घटना घडल्यानंतर सिंधुदुर्ग येथे जात आहे असे सांगून शिल्पकार जयदीप आपटे घरातून बाहेर पडले आहेत, असे त्यांच्या कुटुंबीयांकडून सांगण्यात येते. त्यांचा मोबाईल बंद आहे. शिल्पकार आपटे यांच्यावर मालवण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मालवण पोलीस गुरुवारी सकाळी कल्याणमध्ये दाखल झाले. बाजारपेठ पोलिसांच्या साहा-याने त्यांनी आपटे यांचे घर पाहिले. तेथे टाळे होते. त्यांची पत्नी निशिगंधा ही सुरक्षिततेच्या दृष्टीने कल्याण मधील घरात न राहता माहेरी आपल्या आई, वडिलांच्या घरी राहण्यास गेली आहे. पोलिसांनी तिच्या घरी जाऊन तिचा जबाब नोंदवला. मालवण येथील शिवरायांचा पुतळा उभारल्यानंतर आपटे यांचे कल्याण मधील विविध संस्थांनी त्यांचे कौतुक केले होते. कल्याणमधील खडकपाडा येथील स्वदेशी भारताचा संदेश देणारा सिंहाचा पुतळा शिल्पकार आपटे यांनी उभारला आहे.

## सचिन नागरे यांना महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तहसील अंतर्गत येणाऱ्या किनगाव जटू येथील रहिवासी सचिन जगन नागरे यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. नांदेड येथील महात्मा कबीर समता परिषद वतीने दरवर्षी हा पुरस्कार प्रत्येक जिल्ह्यातील एका उल्लेखनीय क्षेत्रात भूमिका बजावणाऱ्या व्यक्तीला देण्यात येत असतो. यामुळे यंदाचा हा पुरस्कार (२०२३-२४) बुलढाणा जिल्ह्यातुन सचिन नागरे यांना जाहीर झाला आहे. या परिषदेचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. मुकुंदराज पाटील यांनी पुरस्कार निवड मानपत्राव्दारे नुकतेच त्यांना कळवले आहे.



सचिन नागरे यांचे ज्वलंत समस्यांविषयीचे विविध वृत्तपत्रातील पत्रलेखन, स्वच्छता व आदीं विषयीचे चारोळी लेखन ,जनजागृती सामाजिक कार्य, सोशल मीडियावरील जनसंपर्क व आदीं कार्याची विचारपुर्वक दखल घेऊन या पुरस्कारासाठी जिल्ह्यातुन त्यांची निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्यांचा जागृती हा चारोळी संग्रह महाराष्ट्रभर पोहचलेला आहे. विविध सामाजिक संस्थेच्या माध्यमातूनही त्यांनी विविध कामे केलेली आहेत. पुरस्कार जाहीर झाल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होते आहे.

## सुरूची वनराई नष्ट होण्याच्या मार्गावर

**वसई :** वसई म्हटले की, हिरवागार निसर्ग, फळबागा, विस्तीर्ण समुद्रकिनारा, डोंगररांगा, बावखले, सुंदर तलाव असे चित्र समोर येते. निसर्गाच्या समृद्धीने वसईची हरित वसई म्हणून ओळख निर्माण झाली आहे. नागरिकांना शुद्ध आणि ताजी हवा पुरविणारा हा हरितपट्टा म्हणजे हिरवी श्वसनयंत्रणाच आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून वसईचा हरितपट्टा ओरबाडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मागील काही वर्षांत वाढती विकासकामे, नव्याने तयार होत असलेले प्रकल्प, बुजविण्यात येत असलेले जलस्त्रोत, पर्यावरण संवेदनशील क्षेत्र टिकविण्यासाठी होत असलेले दुर्लक्ष, चटई निर्देशांक क्षेत्रात करण्यात आलेली वाढ, वाढते प्रदूषण, अतिक्रमण, बेसुमार वाळू उपसा, पाणी जाण्याचे नैसर्गिक बंद झालेले मार्ग, धूपप्रतिबंधक बंधारे तयार करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष अशा विविध कारणांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला आहे. वसई-विरार शहर पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. अर्नाळा, नवापूर, भुईगाव, राजोडी, सुरुची, कळंब, रानगाव हे किनारे पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. त्यामुळे विविध ठिकाणांहून मोठ्या संख्येने पर्यटक येऊन या निसर्गसौंदर्याचा आनंद लुटतात. विशेषतः मागील काही वर्षांपूर्वी या किनारपट्टीच्या भागात मोठ्या प्रमाणात सुरुच्या झाडांची लागवड करून वनराई तयार करण्यात आली होती. अगदी एकापाठोपाठ एक अशा प्रकारे झाडे असल्याने खऱ्या अर्थाने ही सुरूची झाडे समुद्र किनाऱ्यांची शान बनली होती. परंतु त्या सुरूच्या झाडांचे वेळोवेळी संवर्धन न झाल्याने आज किनारपट्टीवर फेरफटका मारल्यास हजारोंच्या संख्येने झाडे उन्मळू नष्ट झाल्याचे चित्र पाहावयास मिळते. ती नष्ट होत आहेत की नष्ट केली जात आहेत, असा प्रश्न निर्माण होत आहे. ती नष्ट होण्यामागे विविध कारणे आहेत. मागील काही वर्षांपासून वसई-विरारमधील समुद्रात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाळू उपसा सुरूच आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात किनारपट्टीची धूप होऊ लागली आहे. त्याचाच परिणाम हा सुरूच्या झाडांच्या मुळांवरही झाला आहे. वाळू उपसा रोखण्यासाठी शासन स्तरावरून उपाययोजना केल्या जात नाहीत. केवळ एक ते दोन कारवाया होतात. मात्र पुन्हा जैसे थे प्रकार सुरूच असतात. तर काही छुप्या मार्गाने सुरूच्या झाडांची कत्तल करतात. यातून किनारपट्टीच्या भागाचे संरक्षण होईल का, हा विचार होणे गरजेचे आहे. दुसरीकडे समुद्र किनारपट्टीची धूप रोखण्यासाठी व किनाऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी कोकण आपत्ती व्यवस्थापन प्रकल्पाच्या अंतर्गत धूपप्रतिबंधक बंधारे मंजूर करण्यात आले आहेत. मात्र त्यांच्या कामाला गती मिळत नाही. बंधारे तयार केले आहेत तेसुद्धा अपुरेच आहेत. त्यामुळे अनेक समुद्र किनारे हे धूपप्रतिबंधक बंधाऱ्यांविनाच आहेत. वेळीच आवश्यक त्या उपाययोजना करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष याचाच हा परिणाम सुरूच्या बागांवर झाला आहे. समुद्रकिनारी धूपप्रतिबंधक बंधारा नसल्याने थेट लाटा किनाऱ्याला धडकत आहेत. यात सुरूच्या झाडांच्या मुळाखालील मातीची धूप होऊन झाडे कोसळून पडत आहेत. दरवर्षी वसई-विरारमधील समुद्र किनारी हजारोंच्या संख्येने सुरूची झाडे कोसळून नष्ट होत आहेत. सुरूच्या झाडांचे संरक्षण होण्यासाठी सुरक्षा बंधारा तयार करण्यात यावा अशी मागणी नागरिक करीत आहेत. परंतु त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत असल्याने समुद्र किनाऱ्यांची दयनीय अवस्था निर्माण झाली आहे. सुरूची झाडे नष्ट झाली तर हळूहळू वाळवंट तयार होईल, यामुळे याचा परिणाम हा पर्यटनावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उरलीसुरली सुरूची झाडे वाचविण्यासाठी शासनाने पुढाकार घेऊन किनाऱ्यांची धूप कशी थांबवता येईल यावर उपाययोजना होणे काळाची गरज निर्माण झाली आहे. वसई तालुक्यातील समुद्र किनारे पर्यटक, पक्षीप्रेमींसाठी खूप प्रसिद्ध आहेत. तसेच किनाऱ्यालगत विविध पशुपक्षी आश्रयाला येत असल्याने सागरी जिवावर अभ्यास करणारे संशोधक वसई-विरारमधील समुद्र किनाऱ्यावर येत असतात. मात्र येथील सुरूच्या बागांचे निसर्गसौंदर्य नष्ट होत असल्याने पक्ष्यांचा अधिवास धोक्यात आला आहे. दुसरीकडे सुरूची झाडे दिवसेंदिवस कमी होत असल्याने समुद्राचे पाणी थेट किनाऱ्यालगत असलेल्या शेतात घुसू लागले आहे. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसू लागला आहे. पाणी शेतात येत असल्याने शेतीच्या मातीमधील पूर्णतः कस निघून जाऊन येथील विविध प्रकारची शेती धोक्यात आली आहे.

OWNER, PRINTER, PUBLISHER & EDITOR BY ANIL RAJARAM PAWAR PRINTED AT M/S SOMANI PRNITING PRESS, UNIT NO.04, GROUND FLOOR, N.K. INDUSTRIAL ESTATE, OFF AREY ROAD, NEAR PARVASI IND. ESTATE, GATE NO. 2, GOREGAON EAST, MUMBAI-400063, & PUBLISH AT M/81, MARIAMMA NAGAR, WORLI, DR A.B. ROAD,BEHIND NEHRU CENTRE, WORLI MUMBAI - 400018. MAHARASHTRA , Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789 , Mob. 9867110318

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अनिल राजाराम पवार यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.४, ग्राउंड फ्लोअर, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०००६३ महाराष्ट्र येथून मुद्रित, एम/८१,मरिम्मा नगरए वरळी, डॉ. ए.बी. रस्ता, नेहरु सेंटरच्या मागे, वरळी,मुंबई ४०००१८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. मो. ९८६७११०३१८, Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789